08-06-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 07-06-2025 22:14 Page 1



## निवडक

### आमोणा फिडरवर आज खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ७ :** रविवार दि. ८ रोजी ११ केव्ही आमोणा फिडरवर सकाळी ९.३० ते संध्याकाळी ४ यावेळेत वीज वाहिन्यांचे देखभालीचे काम करायचे असल्याने तसेच वीज वाहिन्यांचे नूतनीकरण करायचे असल्याने वरील वेळेत मल्टिपर्पज हॉल सांखळी परिसरात,सांखळी हॉस्पिटल परिसरात, गावठण, वसंतनगर, रवींद्र भवन परिसर,सरकारी महाविद्यालय साखळी व सुपाची पूड परिसरात वीजपुरवठा असणार नाही. यावेळी ग्राहकांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

---

### काँग्रेसची 'संविधान बचाओ यात्रा' आजपासून

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ७ :** लोकशाहीचे रक्षण करण्यासाठी आणि राज्यातील जनतेला त्यांच्या समस्या मांडण्यासाठी, गोवा प्रदेश काँग्रेस समितीने राज्यव्यापी संविधान बचाओ यात्रा आयोजित केली आहे. ही यात्रा भाजप सरकारच्या वाढत्या अपयश आणि भ्रष्टाचारावर लक्ष वेधण्यासाठी तसेच लोकांच्या तक्रारी थेट ऐकण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे.

हा उपक्रम गोव्याच्या सर्व ४० मतदारसंघांमध्ये पार पडणार असून, यात्रेचे नेतृत्व काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते करतील. यात्रा ८ जून २०२५ रोजी दुपारी ४ वाजता मांद्रे येथील जिल्हा पंचायत सभागृहातून सुरू होईल. काँग्रेसच्या निवेदनात म्हटले आहे की, या यात्रेद्वारे भाजप सरकारचा लोकशाही संस्था कमकुवत करण्याचा, स्थानिक जनतेचा आवाज दाबण्याचा आणि राज्यातील संसाधने कॉर्पोरेट कंपन्यांना विकण्याचा प्रयत्न उघड करण्यात येईल.

याच दरम्यान, काँग्रेसने टॅक्सी चालकांच्या समस्या लक्षात घेऊन ट्रान्सपोर्ट ॲग्रीगेटर मार्गदर्शक तत्त्वे, २०२५ तात्काळ मागे घेण्याची मागणी केली आहे. राज्य विधानसभेच्या संकुलात टॅक्सी चालकांच्या तक्रारी ऐकल्यानंतर विरोधी पक्षाच्या नेत्यांनी सरकारवर टॅक्सी चालकांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप केला. ते म्हणाले की, टॅक्सी चालक हे पर्यटन उद्योगाचा कणा असून त्यांचा योग्य प्रकारे सांभाळ केला जावा.

शासनाने पर्यटन धोरण आणि त्याच्या अंमलबजावणीमध्ये अपयश स्वीकारावे लागेल. राजपत्र अधिसूचना तात्काळ रद्द करून टॅक्सी चालकांच्या हितासाठी योग्य पावले उचलली पाहिजेत. तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक असला तरी त्यातून चालकांचे हित धोक्यात येऊ नये, असा आग्रह व्यक्त केला गेला.

टॅक्सी चालकांचा विश्वास जपणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले गेले. पक्षीय विचारांपेक्षा त्यांचे रक्षण करणे हे प्राथमिक असल्याचे स्पष्ट करण्यात आले. टॅक्सी चालकांना त्यांच्या कामावरून दूर रहावे लागणे लज्जास्पद असून, काँग्रेस पक्ष त्यांच्या मागे ठामपणे उभा आहे, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

---

### दीर्घकालीन महसूल प्रकरणांवर दर सोमवारी सुनावणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ७ :** दक्षिण गोवा जिल्ह्यात दीर्घकाळ प्रलंबित महसूल प्रकरणांचा निकाल लवकर लागावा यासाठी जिल्हाधिकारी एग्ना क्लीटस यांनी सर्व उपजिल्हाधिकारी आणि महसूल अधिकाऱ्यांना दर सोमवारी सकाळी विशेष सुनावणी घेण्याचे निर्देश दिले आहेत. ही सुनावणी पाच वर्षांपेक्षा जास्त काळ प्रलंबित असलेल्या प्रकरणांवर केंद्रित असेल.

जिल्हा प्रशासनाने अलीकडेच केलेल्या आढाव्यात विविध महसूल न्यायालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर प्रलंबित प्रकरणे असल्याचे समोर आले. त्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. कायदेशीर प्रक्रियेचा सन्मान राखून या प्रकरणांचे तातडीने निराकरण करण्याची गरज असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी अधोरेखित केले असून, पुढील तीन महिन्यांत ही प्रकरणे निकाली काढण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

या विशेष मोहिमेअंतर्गत प्रत्येक महसूल कार्यालयाने पाच वर्षांहून अधिक काळ प्रलंबित असलेल्या प्रकरणांची साप्ताहिक यादी तयार करणे बंधनकारक असेल. सोमवारी आयोजित होणाऱ्या विशेष सत्रांमध्ये या प्रकरणांना प्राधान्याने सुनावणीसाठी घेतले जाणार आहे. प्रलंबित प्रकरणे निकाली काढल्यानंतर नियमित प्रकरणांचाही विचार केला जाईल.

सुनावणीला अनुपस्थित राहणाऱ्या पक्षकारांसाठी (वकील किंवा अधिकृत प्रतिनिधींसह) आवश्यक असल्यास पर्यायी तारीख देण्याची मुभा आदेशात देण्यात आली आहे. यामुळे न्यायप्रक्रियेतील पारदर्शकता आणि सोयीस्करता सुनिश्चित होईल. प्रत्येक कार्यालयाला झालेल्या सुनावण्या व त्यातून झालेली प्रगती यासंदर्भात तपशीलवार मासिक अहवाल सादर करावा लागणार आहे. या अहवालांचे पुनरावलोकन स्वतः जिल्हाधिकारी करतील, जेणेकरून या मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित होईल.

या मोहिमेच्या अंमलबजावणीसाठी अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांना देखरेख व समन्वयाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यांनी प्रत्येक सुनावणीला बारकाईने लक्ष द्यायचे असून, प्रकरणांचे निकालनिर्णय कायदेशीर चौकटीतच व्हावेत याची खातरजमा करावी लागणार आहे.

वेळीच न्याय देणे, हा आमचा मुख्य उद्देश आहे,असे स्पष्ट करत जिल्हाधिकाऱ्यांनी महसूल न्यायालयीन व्यवस्थेत गतिमानता आणण्याच्या प्रशासनाच्या कटिबद्धतेवर भर दिला. या उपक्रमामुळे महसूल न्यायालयांवरील ताण मोठ्या प्रमाणात कमी होईल, तसेच नागरिकांना न्याय वेळेत मिळवण्याचा मार्ग मोकळा होईल, अशी अपेक्षा आहे.

---

### पर्वरी संजय सेंटरमध्ये जागतिक पर्यावरण उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**पर्वरी, दि. ७ :** येथील संजय सेंटर फॉर स्पेशल एज्युकेशन यांनी जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा केला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा आणि सत्र न्यायालयाचे प्रमुख न्यायाधिश इर्शाद आगा तसेच न्यायिक अधिकारी शांतीश्री शेणवी कुडचडकर, सदस्य सचिव नीतल आमोणकर, मुख्याध्यापक तातू कुडाळकर, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. 'एक पेड माँ के नाम' अभियानातर्गत प्रमुख न्यायाधिश आगा आणि मान्यवरांच्या हस्ते शाळेच्या प्रांगणात रोपटी लावण्यात आली. मुख्याध्यापक कुडाळकर यांनी प्रास्ताविक केले व शेवटी आभार मानले.

# एमडीआर रस्त्याला विरोध कायम

## ग्रामस्थांचा एकमुखी ठराव | एकही घर, दुकान धोक्यात येणार नाही : आ. आरोलकर यांची ग्वाही

■ टीम दैनिक हेराल्ड



**हरमल, दि. ७ :** मांद्रेतील एमडीआर (मेजर डिस्ट्रिक्ट रोड) रस्ता प्रकरणी कोणत्याही परिस्थितीत स्थानिकांची घरे व दुकाने प्रभावित होणार नाहीत, असा ठाम निर्धार आ. जीत आरोलकर यांनी व्यक्त केला आहे. प्रत्येक घर, व्यवसाय सुरक्षित राहील. नागरिकांनी चिंता करू नये, असे आश्वासन त्यांनी हरमल येथे झालेल्या बैठकीत दिले. या बैठकीस सुमारे ७०० नागरिक उपस्थित होते.

हरमल सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या सभागृहात जागृत नागरिक समितीच्या पुढाकाराने ही बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी माजी आ. दयानंद सोपटे, जिल्हा पंचायत सदस्य रंगनाथ कलशावकर, विविध पंचायतींचे सरपंच व सदस्य उपस्थित होते.

एमडीआर-१८ व इतर प्रस्तावित रस्त्यांच्या संदर्भात सध्या सुरू असलेले १०, १५ व २५ मीटर रुंदीचे सर्वेक्षण तात्काळ थांबवावे, तसेच शेतजमिनींतील घरांचे सर्वेक्षणही बंद करावे, असा ठराव या बैठकीत एकमुखी संमत करण्यात आला. ७०० नागरिकांनी हात वर करून याला पाठिंबा दर्शविला.

या प्रकरणात मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांची भेट घेऊन स्पष्ट आश्वासन घेण्याचा मानस आहे, असे आरोलकर यांनी सांगितले. त्यांनी पुढे सांगितले की, २००३ आणि २००७ मध्ये जरी या रस्त्यांची एमडीआर म्हणून अधिसूचना झाली असली, तरी सध्याच्या परिस्थितीत ती अंमलात आणणे योग्य नाही. हा रस्ता एमडीआर नसून ओडीआर (अव्वल जिल्हा रस्ता) राहायला हवा होता, असे ते म्हणाले.

माजी आमदार दयानंद सोपटे यांनी नागरिकांना विश्वास दिला की, मुख्यमंत्र्यांशी चर्चा झाली आहे आणि मांद्रे मतदारसंघासाठी सकारात्मक निर्णय अपेक्षित आहे. जिल्हा पंचायत सदस्य रंगनाथ कलशावकर यांनीही रस्त्यामार्गातील नागरिकांच्या हितासाठी सरकारदरबारी प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त केला. मोरजी जि. प. सदस्य सतीश शेटगावकर यांनी आपल्याकडे अधिकार नसले तरी जनतेसोबत राहू, अशी भूमिका मांडली.

मोरजी सरपंच पवन मोरजे यांनी स्पष्ट केले की, बहुतेक घरे व व्यवसाय भाटकर जमिनीवर असून त्यांच्यावर कोणताही अन्याय होऊ नये.माजी सरपंच प्रशांत बाळा नाईक यांनी, रस्त्याचे नियोजन स्थानिक उद्योगपतींच्या डोंगरजमिनींमध्ये व्हावे, त्याऐवजी नागरिकांच्या घरांसमोर रस्ता नेऊ नये, अशी मागणी केली.बैठकीच्या प्रारंभी पहलगाम येथे शहीद झालेल्या भारतीय जवानांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

# वेळसाव वाद प्रकरण : काँग्रेसचा 'जेल भरो' आंदोलनाचा इशारा

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. ७ :** वेळसाव रेल्वे ट्रॅक दुहेरीकरण प्रकरणात पोलिसांनी चार स्थानिकांविरोधात दाखल केलेल्या गुन्ह्याच्या निषेधार्थ गोवा प्रदेश काँग्रेस समितीने तीव्र भूमिका घेतली असून, आरोप मागे न घेतल्यास 'जेल भरो आंदोलन' छेडण्याचा इशारा दिला आहे.

पोलिसांनी काँग्रेसचे कोषाध्यक्ष ऑरव्हिल डोराडो रॉड्रिग्ज, नेते ओलेन्सियो सिमोस, – वेळसाव – पाळे –आरोसीच्या सरपंच मारिया डायना गौविया आणि जमीन मालक सँड्रा रॉड्रिग्ज यांच्यावर गुन्हे दाखल केल्यानंतर काँग्रेसकडून ही प्रतिक्रिया आली आहे. याबाबत कॉन्ग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, हे आरोप विनाबुद्धीचे आहेत. ते तात्काळ मागे घ्या, अन्यथा हजारो काँग्रेस कार्यकर्ते रस्त्यावर उतरून जेल भरो आंदोलन करतील. अटक झालेले कोणीही जामिनासाठी अर्ज करणार नाहीत.पाटकर यांनी सांगितले की, २९ जानेवारी २०२५ रोजी ग्रामपंचायतीने रेल्वे कंत्राटदारांच्या अतिक्रमणावर आक्षेप घेत काम थांबवण्याचा आदेश दिला होता. रेल्वे कायद्याच्या तरतुदींनुसार जारी केलेल्या या आदेशाची रेल्वेने सरळपणे अवहेलना केली. उलट रेल्वेच्या कामाला पोलिस संरक्षण मिळत राहिले.

यावेळी कॉन्ग्रेस नेत्यांकडून माजी मुख्यमंत्री मनोहर पर्रिकर यांचा एक व्हिडीओ सादर केला, ज्यामध्ये पर्रिकर यांनी कोळसा वाहतूक आणि दुहेरीकरण प्रकल्पाला विरोध दर्शवला होता. भाजपने जर पर्रिकरांचे खरे वारसदार असल्याचा दावा केला, तर त्यांनी हा प्रकल्प रद्द का केला नाही? असा थेट सवाल पाटकर यांनी उपस्थित केला.

डॉ. नोरोन्हा विरुद्ध साउथ वेस्टर्न रेल्वे या प्रकरणाचा उल्लेख करत पाटकर म्हणाले की, मुंबई उच्च न्यायालयाच्या गोवा खंडपीठाने अलीकडेच रेल्वेच्या अतिक्रमणाला आळा घालणारा आदेश दिला आहे. रेल्वेने न्यायालयात लेखी कबुली दिल्यानंतर दुहेरी ट्रॅकिंगचे काम थांबवण्यात आले.

काँग्रेस कोषाध्यक्ष ऑरव्हिल डोराडो रॉड्रिग्ज यांनी सांगितले की, गावकऱ्यांनी पोलिस संरक्षण मागितले असतानाही, वेर्णा व वास्को पोलिस ठाण्यांमधून मोठ्या संख्येने पोलिस येऊन उलटपक्षी रेल्वेच्या कंत्राटदारांना मदत करत चिखल टाकण्यास मोकळीक दिली. दक्षिण गोव्याचे खासदार कॅप्टन विरियातो फर्नांडिस यांनी या डंपिंगविरोधात केलेल्या अपीललाही यंत्रणांकडून प्रतिसाद मिळाला नाही.

ओलेन्सियो सिमोस यांनी सांगितले की, सर्वोच्च न्यायालयाने कृष्णपट्टणम येथे कोळसा हाताळणीसाठी पर्यायी बंदर सुचवले होते. सध्याची रेल्वे लाईन अपुरेपणाने वापरली जाते. अशा परिस्थितीत दुहेरीकरणाचा कोणताही ठोस गरज नाही, असे सिमोस म्हणाले.

जमीन मालक सँड्रा रॉड्रिग्ज यांनी भावनिक अनुभव सांगितला की, त्यांच्या वडिलांचे अंत्यसंस्कार त्यांच्या स्वतःच्या घरातून करता आले नाहीत कारण रेल्वेच्या अतिक्रमणामुळे घरात प्रवेशच शक्य नव्हता. त्यांना बहिणीच्या घरी अंत्यसंस्कार करावे लागले. आमदारांनी आमची अडचण समजून घेण्यासाठी भेट दिली नाही. पाठवलेली पत्रे रेल्वे प्रशासनाकडे वळवली जात होती, पण त्याचे कोणतेही सकारात्मक उत्तर मिळाले नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.काँग्रेसने या प्रकरणात स्पष्टपणे आक्रमक भूमिका घेतली असून, प्रशासनाकडून अन्यायकारक कारवाया सुरू राहिल्यास मोठ्या जनआंदोलनाचा इशारा दिला आहे.

# कवळेमध्ये उघडे सिंचनखड्डे बनले जीवघेणे



■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ७ :** कवळे परिसरातील शेतीसाठी खोदले गेलेले उघडे सिंचनखड्डे गुरांसाठी मृत्यूचे सापळे ठरत असून, यामुळे केवळ पशुधनाचे नुकसान होण्याचा धोका निर्माण झाला नाही, तर कवळे मध्ये येणाऱ्या पर्यटकांनाही याचा गंभीर फटका बसण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. घटनाक्रम लक्षात घेता स्थानिकांनी प्रशासनाकडे तात्काळ हस्तक्षेपाची मागणी केली आहे.

शुक्रवारी (६ जून) रात्री अशाच एका घटनेत, एका गायीचा पाय शेतातील खड्ड्यात अडकल्याने ती अडकून पडली होती. तिच्या आवाजामुळे आसपासच्या स्थानिकांना याचा पत्ता लागला. त्यांनी तातडीने अग्निशमन दलाला माहिती दिली आणि त्यांच्या मदतीने गायीला खड्ड्यातून बाहेर काढण्यात यश आले.

स्थानिकांनी सांगितले की, हे खड्डे गेल्या काही वर्षांपासून भाजीपाला पिकांना पाणी देण्यासाठी खोदले जात आहेत. शांतादुर्गा मंदिराच्या परिसरातील या शेतांमध्ये पावसाळ्यात पाणी साचत असून खड्डे चिखलाने भरलेले नसतात, त्यामुळे ते अधिक घसरणीचे आणि धोकादायक बनतात. अंधारात किंवा पावसाच्या काळात हे खड्डे दिसत नाहीत आणि त्यामुळे गुरे किंवा अगदी माणसेही त्यात अडकण्याची शक्यता असते.

प्रसिद्ध शांतादुर्गा मंदिरामुळे कवळे हे गोव्यातील एक महत्त्वाचे पर्यटन स्थळ आहे. अनेक पर्यटक मंदिर परिसरात फेरफटका मारतात. काही वेळा शेतात जाणाऱ्यांना हे खड्डे न दिसल्यास गंभीर अपघात होऊ शकतो, असे एका स्थानिक रहिवाशाने सांगितले.

शेतीच्या गरजांमुळे खड्डे आवश्यक असले, तरी सुरक्षेच्या दृष्टीने योग्य ती खबरदारी घेतली जाणे गरजेचे असल्याचे मत अनेक स्थानिकांनी व्यक्त केले. ते पुढे म्हणाले की, या खड्ड्यांमुळे दरवर्षी गुरांची अडचण होते. अग्निशमन दल आणि गावकरी वेळोवेळी प्राणधोक्यात घालून प्राणी वाचवतात. यावर कायमस्वरूपी उपाय आवश्यक आहे.

या पार्श्वभूमीवर स्थानिकांनी प्रशासनाला विनंती केली आहे की, चारही प्रमुख खड्डे तातडीने चिखलाने किंवा मातीने बुजवावेत, जेणेकरून अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही. याशिवाय जिल्हाधिकारी कार्यालयाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे आणि संभाव्य अपघात रोखण्यासाठी तात्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

# एफडीएची धडक कारवाई सुरूच

■ टीम दैनिक हेराल्ड

## ओल्ड स्टेशन रोडवरील फूड स्टॉलवर बंदी



**मडगाव, दि. ७ :** अन्नसुरक्षा नियमांचे वारंवार उल्लंघन केल्याप्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मडगाव येथील एका अन्न व्यवसायावर कडक कारवाई करत तत्काळ अन्नाशी संबंधित सर्व कामकाज थांबवण्याचे आदेश दिले आहेत.

ही कारवाई ५ जून २०२५ रोजी ओल्ड स्टेशन रोडवरील संबंधित युनिटवर करण्यात आली. याआधी २८ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या तपासणीत एफडीए अधिकाऱ्यांनी अन्न साठवणूक, स्वच्छता आणि प्रक्रियेत गंभीर त्रुटी असल्याचे निदर्शनास आणले होते. त्यावेळी तब्बल ३० कमतरता नोंदवल्या गेल्या होत्या, ज्या सार्वजनिक आरोग्याला धोका पोहोचवू शकणाऱ्या होत्या.

त्यानंतर संबंधित युनिटला कारणे दाखवा नोटीस देण्यात आली होती आणि अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांकडून अनुपालन अहवाल मागविण्यात आला होता. मात्र, अलीकडे करण्यात आलेल्या पुनर्पडताळणी तपासणीत केवळ ५ कमतरताच दुरुस्त करण्यात आल्याचे आढळून आले. उर्वरित त्रुटी कायम असल्याने एफडीएने तीव्र नोंद घेतली आणि कायदेशीर कारवाईचा निर्णय घेतला.

एफडीएने अन्न सुरक्षा व मानके कायदा, २००६ च्या कलम ५६ नुसार हा गंभीर गुन्हा मानून संबंधित युनिटवर दंडात्मक कारवाई सुरू केली आहे. मात्र, या अहवालाच्या वेळी दंड अद्याप भरलेला नव्हता. त्याचबरोबर युनिटमधील सर्व अन्नसंबंधित कामकाज तत्काळ थांबवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आता केवळ अन्नसुरक्षा नियमांचे पूर्ण पालन झाल्यानंतरच या युनिटला पुन्हा कार्य सुरू करण्याची परवानगी दिली जाणार आहे.

ही तपासणी आणि अंमलबजावणी अन्न सुरक्षा अधिकारी अतुल देसाई, अमरदीप गौडे प्रियोलकर आणि प्रदीक्षा चोपडेकर यांच्या सहकार्याने, दक्षिण गोव्याचे एफडीओ संज्योत कुडाळकर यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. एफडीएने गोव्यातील सर्व अन्न व्यवसायिकांना अन्न सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे. जनतेला देखील सतर्क राहण्याचे आणि कुठल्याही संशयास्पद अथवा असुरक्षित अन्न प्रक्रियेबाबत तात्काळ तक्रार नोंदवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. एफडीएने स्पष्ट केले आहे की, सार्वजनिक आरोग्याच्या रक्षणासाठी कठोर पावले उचलण्यात कोणतीही ढिलाई केली जाणार नाही.

# बोंडबाग-दुर्गाभट परिसर झाला कचराकुंडी

## भटक्या प्राण्यांचा धोका, दुर्गंधीने नागरिक त्रस्त | रहिवाशांमध्ये तीव्र नाराजी

■ टीम दैनिक हेराल्ड



**फोंडा, दि. ७ :** बेतोडा -निरंकाळ-कोडार पंचायतीच्या सीमेलगत असलेल्या बोंडबाग-दुर्गाभाट रस्त्याच्या कडेला अनधिकृतरित्या कचरा टाकण्याचे प्रमाण वाढले असून, त्यामुळे परिसरातील रहिवाशांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. एकीकडे कचऱ्याचा दुर्गंधीचा त्रास, तर दुसरीकडे भटक्या प्राण्यांचा धोका या दुहेरी समस्येमुळे स्थानिक जनतेचे आरोग्य आणि सुरक्षितता धोक्यात आली आहे.

स्थानिकांनी सांगितले की, रस्त्याच्या कडेला सर्रास ओला-सुका कचरा, प्लास्टिक पिशव्या, अन्नाचा उरलेला भाग, आणि कधी कधी कोंबडीचा कच्चा कचरा देखील टाकला जातो. यामुळे माश्या, डास, घाण करणारे प्राणी, आणि भटक्या कुत्र्यांचे संख्यात्मक प्रमाण वाढले आहे.

स्थानिक रहिवासी मंगलदास गावडे यांनी संताप व्यक्त करत सांगितले की, पीएमसी आणि पंचायत दोघेही या ठिकाणी दुर्लक्ष करत आहेत. आरोग्य विभाग केवळ पाहणी करून निघून जातो, कारवाई काहीच केली जात नाही. भटक्या प्राण्यांमुळे घराबाहेर पडणे देखील अवघड झाले आहे. खाण्याच्या वेळी माशा आणि कीटक अन्नावर बसतात, त्यामुळे अन्न खाणे अशक्य होते.

या कचराकुंडीच्या पार्श्वभूमीवर या परिसरात घडलेल्या गंभीर घटनांमुळे स्थानिक अधिक भयभीत झाले आहेत. मागील वर्षी बोंडबागमध्ये एका महिलेला जंगली गव्याने ठार केले होते, तर यावर्षी दुर्गाभट परिसरात भटक्या कुत्र्याच्या हल्ल्यात दोन वर्षांच्या मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. स्थानिक नागरिक नरेश नाईक यांनी प्रशासनाला आवाहन केले की, या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवून जो कोणी येथे कचरा टाकतो त्यांच्यावर दंडात्मक कारवाई केली पाहिजे. अन्यथा नागरिकांचा संयम सुटेल.

फोंडा महापालिकेतील एका अधिकाऱ्याने सांगितले की, महापालिकेचे कर्मचारी नियमितपणे कचरा गोळा करतात. पण काही प्रवासी आणि नागरिक एकाकी रस्त्यावर कचरा टाकण्याची सवय लावून घेतली आहे. मात्र, स्थानिकांचे म्हणणे आहे की या समस्येवर फक्त सफाई कर्मचाऱ्यांच्या कामावर भर न देता, सुसंगत कायदेशीर कारवाई आणि जनजागृती मोहिमा राबवणे आवश्यक आहे.

बोंडबाग-दुर्गाभट परिसरातील ही समस्या केवळ स्वच्छतेपुरती मर्यादित नसून ती थेट जनतेच्या आरोग्य, सुरक्षितता आणि सामाजिक शिस्तीशी संबंधित आहे. स्थानिक प्रशासन, आरोग्य विभाग आणि पोलिसांनी संयुक्तरित्या पुढाकार घेऊन कचरा व्यवस्थापनाचा ठोस आराखडा तयार करणे आणि दोषींवर कठोर कारवाई करणे काळाची गरज आहे. अन्यथा, या समस्या भविष्यात आणखी गंभीर रूप धारण करू शकतात.


**MBBS**



**Ministry Of Health Of Russia**

**SMOLENSK STATE MEDICAL UNIVERSITY, RUSSIA**

**Invites Indian students for direct Government Admissions**
**Recognized by India, WHO, USA & UK, Min. Qual. 50% in XII in PCB**
**Satisfies all requirements of NMC of India**

**UNIVERSITY** – 105 years old Medical University. The University is situated in the center of the Smolensk city. Smolensk is situated 380 km west of Moscow. Very high standards of education, strict disciplinary system. **2170** Indian students (**960** Girls) studying, **244** getting degree in **2025.** Duration 6 years including internship and License. English Medium in all years, Closed type campus system, **8** attached hospitals (**9000** Beds).

**MCI SCREENING TEST** – Our graduates of **2008** to **2024** have given **BEST** results among graduates of all foreign medical colleges (Official web sites of Indian Embassy, Moscow and NBC conducting Screening Test confirm this). Dr. Aadi Morakhia, our graduate of 2023, has topped Screening Test 2023.

**SPECIAL HOSTELS ONLY FOR INDIAN STUDENTS (BEST HOSTELS IN RUSSIA)** 2 and 4 seated big rooms, separate hostels for boys and girls.

**INDIAN MESS** - Mess with **Indian food** cooked by **Indian cooks**.

**Fee** (Tuition+Hostel+Med.Ins.) – **USD 6000** (Approx. Rs. 5,10,000/-) per year and one time payment of Rs.1,50,000/- (By Bank Draft only) which includes – Admission procedure, invitation letter, student visa, air ticket Delhi - Moscow.

**Scholarship to all Indian students.**

Bank loans are available from Indian banks.

Contact: **DR. ALOK AERON +7 9605805555 (Russia)**

**Official web site: www.sgmu.info**

**Instagram: @sgmu.info**

**Admission details: admission.sgmu.live**

**INFORMATION CENTERS: (These are parents of our students)**

**Margao:** Mr. Desai – 9850466525, **Ponda:** Mr. Chodankar – 8010274925

**Mapusa:** Mr. Kauthankar – 9823674160

**Curchorem:** Mrs. Naik – 9130630410, **Cuncolim:** Mr. Dessai – 9850785115